# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २०५-२२** **दिनांक ०७/०७/२०२२**

## बालमजुरांकडून काम करुन घेणाऱ्या इसमास अटक करुन ०२ बाल मजुरांची सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर यांची कामगिरी.

दिनांक ०६.०७.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर यांना बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, इसम नामे अभिषेककुमार हे मे. अभिषेक स्टील कंपनी, गाळा नं.०४, आराधना इंडस्ट्रीयल इस्टेट, नवघर रोड, भाईंदर (पुर्व) या ठिकाणी अल्पवयीन मुलांना कामावर ठेवून त्यांचेकडून सक्तीने बेकायदेशीर तसेच जिवीतास धोका होईल असे काम करुन घेत आहेत.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोनि. श्री. देविदास हंडोरे यांनी पंचासह मे. अभिषेक स्टील कंपनी, गाळा नं.०४, आराधना इंडस्ट्रीयल इस्टेट, नवघर रोड, भाईंदर पुर्व ता. जि. ठाणे या ठिकाणी पोलीस पथकासह दिनांक ६/७/२०२२ रोजी १४.२५ वा. छापा कारवाई केली असता ०२ अल्पवयीन मुले स्टीलचे कंपनीमध्ये इलेक्ट्रीक लोखंडी प्रेस मशीनवर काम करत असतांना मिळुन आल्याने त्यांना सुरक्षिततेसाठी ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत कंपनीचे मालक अभिषेककुमार रामबाबु महतो, वय-२० वर्ष यांचे विरुध्द पो.शि./१२११८ केशव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ५११/२०२२ भा.द.वि.कलम ३७४, ३४ सह बाल व किशोर वयीन (प्रतिबंध) सुधारीत कायदा २०१६ चे कलम ३ (ए) सह बाल न्याय अधिनियम ७५, ७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अती. कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. देविदास हंडोरे, स.पो.उप.नि. विजय निलंगे, म.पो.हवा./सुप्रिया तिवले, पो.हवा./सम्राट गावडे (चालक), पो.शि./केशव शिंदे, सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.